**पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे श्रीमती ए.एस.झांपले वकील यांच्याकडून**

( लघुलेखक नसल्याने उपलब्ध न्यायालयीन लिपीकामार्फत सदर उलटपास टंकलिखीत करण्याचा असल्याने तो मराठी भाषेमध्ये नोंदवला.)

हे म्हणणे खरे की, अहमदपूर नगर परिषदेसाठी करावयाच्या पाणीयोजनेबाबत सदरील वादातील ट्रेंडर काढले होते. हे खरे की, अग्रीमेंटच्या पान ९१ वर योजनेची स्थळपाहणी, वातावरण, संभाव्य अडथळे याबाबीची पाहणी करावी असा उल्लेख आहे. मी या साईटची पाहणी केली होती. हे खरे नाही की, प्रत्यक्ष जागेवर प्रकल्पाच्या उभारणीत अडथळे आल्यास ते दूर करण्याची जबाबदारी नगरपरिषदेची होती . मी अग्रीमेंट वाचलेले आहे. हे खरे नाही की, प्रत्यक्ष जागेवर काम करायला आम्हांला अडचणी आल्या तेंव्हा आम्ही नगरपरिषदेला अर्ज दिला. अग्रीमेंटमध्ये या अडचणी जीवन प्राधिकरणाने सोडवाव्यात अशा तरतूदी नाहीत हे म्हणणे खरे आहे. हे खरे की, इतरांपेक्षा कमी मुल्य असल्याने आणि अटी व शर्ती मान्य असल्याने माझी निविदा मंजूर झाली. हे खरे की, त्यामुळेच मला अनामत रक्कम भरावी लागली. हे खरे की, त्यानंतर दि.२९/०४/२००९ रोजी मला कार्य आदेश मिळाला. मी पाईप आणले. हे खरे की, मी मजूर गोळा केले, खोदकामाची मशीनरी मागवली, जिथून पाईप जमीनीत पुरायचे त्या जागेची पाहणी केली. हे खरे की, मजूर आणणे मशीनरी आणणे, त्यात कमी-जास्त काही झाले ती जबाबदारी माझी असते. हे खरे नाही की, मजूर आणि मशीनरी आणण्यास मला १५ दिवस लागले.

(सदर साक्षीदाराने प्रतिवादीच्या वकीलांना अग्रीमेंटवर प्रश्न विचारण्यास हरकत घेतली, माझे पैसे देणे आहे एवढयावर प्रश्न विचारा, फालतू प्रश्नांची उत्तरे मी देणार नाही असे उद्धट उत्तर प्रतिवादीच्या वकीलांना दिले. प्रतिवादीच्या वकीलांचा कैफीयतीप्रमाणे आणि दाव्यात दाखल कागदपत्रांप्रमाणे उलटतपास घेण्याचा अधिकार साक्षीदारास सांगण्यास

आला तरीही अत्यंत मोठया आवाजात आणि शेजारील कामकाज सुरु असलेल्या न्यायालयास अडथळा होईल अशा भाषेमध्ये साक्षीदाराने अध्द्वातध्वा वितंड वाद केला. त्यामुळे सदर साक्षीदार याने आपल्या वकीलांना आपल्या उलटतपासाच्यावेळी हजर ठेवावे, असे त्यांना सांगण्यात आले. साक्षीदार अत्यंत उर्मठपणाने न्यायालयातून निघून गेले. )

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

स्वाक्षरीत/-

(एस.एन.सरडे)

दिनांक १८/०७/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.